# दि पूना मर्चंटस् चेंबर
# The Poona Merchant's Chamber

UNITED WE STAND DIVIDED WE FALL

BSCIC JAS-ANZ ISO 9001-2008 Regd.

Register office : Vyapar Bhavan, C-50, Market Yard, Gultekdi, Pune - 411037. MAH - INDIA

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव | सहसचिव | माजी अध्यक्ष |
|---|---|---|---|---|
| राजेंद्र बाठिया | अजित बोरा | रायकुमार नहार | इश्वर नहार | प्रविण चोरबेले |
| 98220 37616 | 98902 37799 | 98229 67911 | 94220 79842 | 98220 18661 |


कृपया प्रसिध्दीसाठी

दिनांक : १७/१०/२०२२

## चेंबरच्या रास्त दरातील लाडू-चिवडा विक्री उपक्रमास उत्साहात सुरूवात.

पुणे,दि. १७ - व्यापारी हा समाजातील महत्वाचा घटक असून तो गोर - गरिबांसाठी सदैव झटत असतो. रास्त दरात लाडू - चिवडा हा उपक्रम त्याचाच भाग असून या उपक्रमाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड व लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झालेली असली तरी या उपक्रमामुळे सामान्य जनतेच्या चेहऱ्यावर जो आनंद आणि समाधान हेच खरे व महत्वाचे प्रमाणपत्र आहे. सलग ३५ वर्ष हा कार्यक्रम सातत्याने करणे ही खूप मोठी गोष्ट आहे असे गौरवोद्गार पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील यांनी आज काढले. लाडू-चिवडा उपक्रमाचे उद्घाटन आज सोमवार दि. १७ ऑक्टोंबर रोजी श्री. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मा. श्री. विद्याधरजी अनास्कर, आमदार मा. श्री. सुनिलजी कांबळे, नगरसेवक मा. श्री. श्रीनाथजी भिमाले व भाजप पुणे शहर संघटन सरचिटणीस मा. श्री. राजेशजी पांडे, मा. श्री. अचलजी जैन प्रशासक मा. श्री. मधुकांतजी गरड, चीफ एडवायजर सिस्टम महारेलाचे मा. श्री. प्रदीपकुमार श्रीवास्तव, तसेच व्यासपिठावर चेंबरचे अध्यक्ष श्री. राजेंद्र बाठिया, उपाध्यक्ष श्री. अजित बोरा, सचिव श्री. रायकुमार नहार, सहसचिव श्री. ईश्वर नहार माजी अध्यक्ष श्री. प्रविण चोरबेले, बहूसंख्य सभासद बंधू व दलाल बंधू तसेच विक्री केंद्रांचे प्रतिनिधी यांच्या प्रमुख उपस्थितीत नाजुश्री सभागृह, जयजिनेंद्र प्रतिष्ठान, मार्केट यार्ड येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. व्यापार करीत असतानाच चेंबरच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेऊन विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. नागरीकांच्या मागणीनुसार या वर्षी प्रथमच अर्धा किलोच्या पॅकिंगमध्ये लाडू व चिवडा उपलब्ध केलेला आहे. यंदा लाडू व चिवड्याचा १ किलोचा भाव फक्त १५०/- रुपये व अर्धा किलोचा भाव फक्त ८०/- रुपये दराने आम्ही उपलब्ध करून देत आहोत.


• नोंदणीकृत कार्यालय : व्यापार भवन, सी-५०, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११ ०३७. महा. इंडिया

फोन : २४२७११२०, २४२७११३० फॅक्स : ०२०-२४२७११५० मो.: ९६९९३७२७०४

CIN No.: U99999PN1950NPL008348

Website : www.pune-merchants.com • poonamerchantschamber@hotmail.com • poonamerchantschamber@gmail.com

या उपक्रमाचे हे ३५ वे वर्ष आहे. यावेळी या उपक्रमाला सहकार्य करणारे श्री. पप्पु महाराज, डॉ. विजय सेटिया व शहरातील लाडू चिवड्याचे वितरक आदींचा सत्कार करण्यात आला. यावेळी मा. श्री. मा. आमदार मा. श्री. योगेशजी टिळक, ॲड. सुर्यकातजी पाठक, मा. श्री. कृष्णकुमारजी गोयल, मा. श्री. अनिल वखारिया, मा. श्री. राजेशजी शहा, मा. श्री. राजेशजी फुलफगर, मा. श्री. वालचंदजी संचेती, मा. श्री. राजेंद्रजी गुगळे, मा. श्री. दिपकजी बोरा व विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्याक्रमात सुमारे १५ सामाजिक संस्थांना तसेच आम्ही पुणेकर या संस्थेस सरहद्दीवरील जवानांसाठी लाडू चिवड्याचे मोफत वितरण करण्यात आले.

( राजेंद्र बाठिया )
अध्यक्ष